# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड        जा.क्र.  33/2022        दिनांक : 25/01/2022**

**पोलीस अधीक्षक कार्यालयात घेतली "राष्ट्रीय मतदार दिनाची"  शपथ**

भारत निवडणुक आयोगाच्या सुचनांनुसार दिनांक 25 जानेवारी, 2022 रोजी "राष्ट्रीय मतदार दिवस" साजरा करण्याच्या सुचना प्राप्त झाल्याने. 18 वर्षे पुर्ण केलेल्या नवीन तरुण मतदारांचा मतदार यादीत समावेश करणे व त्यांचा मतदान प्रक्रियेत सहभाग वाढविणे हा या कार्यक्रमामागचा प्रमुख उद्देश आहे. राष्ट्रीय मतदार दिवशी लोकशाही वर निष्ठा ठेवण्याची शपथ सर्व मतदारांना दिली जाते. त्याचाच भाग म्हणुन आज दिनांक 25 जानेवारी, 2022 रोजी 11.30 वा. पोलीस अधीक्षक कार्यालयात राष्ट्रीय मतदार दिवसाची शपथ घेण्यात आली. पोलीस अधीक्षक **मा. श्री प्रमोदकुमार शेवाळे साहेब** यांचे मार्गदर्शनाखाली, अपर पोलीस अधीक्षक **मा. श्री विजय कबाडे साहेब** यांनी  शपथेचे वाचन केले. त्या पाठोपाठ सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी वाचन केले. या प्रसंगी पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय) **मा. श्रीमती अर्चना पाटील मॅडम, पोनि श्री व्दारकादास चिखलीकर साहेब,** स्थागुशा,  **सपोनि श्री शिवाजी लष्करे,** जनसंपर्क अधीकारी नांदेड, **सपोनि श्री पांडुरंग भारती,** स्थागुशा, पोलीस नियंत्रण कक्ष, पो.मु. व इतर पोलीस अधीकारी व अंमलदार, कार्यालयीन कर्मचारी मोठया संख्येने हजर होते.

**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधिक्षक कार्यालय,नांदेड**

